महाराष्ट्र शासन
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६
दूरध्वनी क्रमांक (०२०) २५६५६२३४, Web : www.ropune.org.in Email : ropune@dtemaharashtra.gov.in

*कालमर्यादा – १०/१०/२०२४.*

जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-३(ब)/पदोन्नती/२०२४/ 3948

दिनांक - 3 OCT 2024

*परिपत्रक :*

विषय :- गट क मधील पदे पदोन्नतीने भरणेबाबत..

संदर्भ : या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक तंशिविकापु/आस्था-३(ब)/पदोन्नती/२०१८/३४११, दिनांक २१/०८/२०२४.

संदर्भित परिपत्रकान्वये या कार्यालयाच्या अधिपत्याखालील शासकीय संस्थामधील गट क मधील पदोन्नतीची विविध तांत्रिक पदे ज्येष्ठता अधिन पात्रता विचारात घेऊन पदोन्नतीने भरण्याकरिता सदर पदोन्नतीच्या पदासाठी आवश्यक असलेली अर्हता धारण करीत असलेल्या कर्मचा-यांची माहिती, त्यांचे अर्ज व आवश्यक त्या कागदपत्रांच्या साक्षांकित छायाप्रतींसह या कार्यालयास सादर करणेबाबत कळविण्यात आलेले होते.

**आता या कार्यालयाच्या संदर्भित परिपत्रकामध्ये अंशतः बदल करण्यात येत असून, खालील प्रमाणे सुधारित परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.**

या कार्यालयाच्या अधिपत्याखालील शासकीय संस्थामधील **खाली नमूद केलेली गट क मधील पदोन्नतीची पदे "ज्येष्ठता अधिन पात्रता"** विचारात घेऊन पदोन्नतीने भरावयाची आहेत. सदर पदासाठी वेतनश्रेणी व आवश्यक अर्हता खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | पदोन्नत पदाचे पदनाम व वेतनश्रेणी | ज्या संवर्गातून / पदामधून पद भरावयाचे आहे त्याचे पदनाम | आवश्यक अर्हता |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| ०१ | निदेशक (जोडारी)<br>(वेतन स्तर – एस ८ : २५५०० – ८११००)<br>(०१ पद) | गट - क / ड मधील पदे | १) सध्याच्या पदावर किमान तीन वर्षे सेवा पूर्ण.<br>२) किमान साक्षर<br>३) जोडारी (फिटर) अथवा समकक्ष ट्रेड उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र असल्यास प्राधान्य<br>४) पदाची कर्तव्ये पार पाडण्यासाठी पुरेसा व समाधानकारक अनुभव आवश्यक.<br>५) जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राची प्रत (मागासवर्गीयांसाठी) |
| ०२ | निदेशक (कातारी)<br>(वेतन स्तर – एस ८ : २५५०० – ८११००)<br>(०२ पदे) | गट - क / ड मधील पदे | १) सध्याच्या पदावर किमान तीन वर्षे सेवा पूर्ण.<br>२) किमान साक्षर<br>३) कातारी (टर्नर) अथवा समकक्ष ट्रेड उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र असल्यास प्राधान्य<br>४) पदाची कर्तव्ये पार पाडण्यासाठी पुरेसा व समाधानकारक अनुभव आवश्यक.<br>५) जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राची प्रत (मागासवर्गीयांसाठी) |
| ०३ | निदेशक (लोहार)<br>(वेतन स्तर – एस ८ : २५५०० – ८११००)<br>(०१ पद) | गट - क / ड मधील पदे | १) सध्याच्या पदावर किमान तीन वर्षे सेवा पूर्ण.<br>२) किमान साक्षर<br>३) लोहार (स्मिथ) अथवा समकक्ष ट्रेड उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र असल्यास प्राधान्य<br>४) पदाची कर्तव्ये पार पाडण्यासाठी पुरेसा व समाधानकारक अनुभव आवश्यक.<br>५) सदर पदासाठी BLACKSMITH किंवा FORGER & HEAT TREATMENT हा अभ्यासक्रम शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून पूर्ण करणे आवश्यक.<br>६) जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राची प्रत (मागासवर्गीयांसाठी) |

